**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठात एम.ए. (मराठी) वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

अमरावती -

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील एम.ए. मराठी भाग-१ च्या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून कोणत्याही विषयात पदवी मिळवणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यास एम.ए. मराठी भाग-१ ला प्रवेश घेता येईल. प्रवेश अर्ज ऑनलाईन भरावयचा असून अधिक माहितीसाठी आणि प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी कार्यालयीन वेळात विभागात किंवा प्रवेश समितीच्या कार्यालयात संपर्क साधावा. प्रवेशासाठी दहावीपासूनच्या सर्व गुणपत्रिका, सवलतीचा फायदा मिळत असल्यास जात-प्रमाणपत्र आणि मूळ टी.सी. ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

या विभागात विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, प्रा.डॉ. मनोज तायडे, प्रा.डॉ. हेमंत खडके, प्रा.डॉ. माधव पुटवाड, प्रा.डॉ. प्रणव कोलते अशा संशोधक अध्यापकांच्या अध्यापनाचा व मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणार असून अभ्यासक्रमात नमूद सर्व विषयांचे पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांकाने झळकण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

संगणकीय उपकरणे, इंटरनेट, अभ्यासपूरक चित्रफिती आणि ध्वनिफितींनी विभाग सज्ज आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त सेट, नेट तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर विभागाचा भर असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम-कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यानिमित्त मान्यवर साहित्यिकांच्या भाषणांचा व मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळतो. विभागातील चांगल्या शैक्षणिक व वाङ्मयीन वातावरणाचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे यांनी केले आहे.

---

प्रति,                                                                                    **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                                     दि. ०९/०८/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी